**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** – विलास कृष्णा कोकीतकर.

**वय** – ५४ वर्ष, **व्यवसाय** – शेती,

**राहणार.**– मेंढोली, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**सरतपास– श्रीमती. एन. डी. चव्हाण, सरकारी वकील.**

**१.** मी दि.२१.१०.२०२२ रोजी शेताकडे जात असताना पोलिसांनी मला फिर्यादीच्या घराच्या पाठीमागे परडयात जागेचा पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. पोलिसांनी तेथे माझ्या समक्ष पंचनामा करुन त्यावरती माझी स्वाक्षरी घेतली होती. ती जागा फिर्यादीने पोलिसांना दाखवली होती. आता मला तो पंचनामा दाखवला, त्यावरती माझी अनु. क्र. २ वरती स्वाक्षरी असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि. क्र. पी. ३२** देण्यात येतो.

**२.** त्यानंतर पोलिसांनी मला पुन्हा दि.०२.११.२०२२ रोजी सकाळी ०८.०० वाजता पोलिस ठाण्यात जप्ती पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. तेथे पोलिसांनी अटक केलेला आरोपी क्र.१ हजर होता. तेथे त्याने माझ्या समक्ष पोलिसांना मारहाण केलेली काठी काढून देतो असे सांगितले होते. पोलिसांनी त्याबाबतचा निवेदन पंचनामा केला होता. आता मला तो पंचनामा दाखवला. त्यावरती माझी अ. क्र.१ वरती स्वाक्षरी असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि. क्र. पी. ३३** देण्यात येतो. त्यावरती माझ्या सोबत असलेल्या दुस–या पंचाची देखील स्वाक्षरी आहे.

**३.** आरोपी क्र.१ ने दिलेल्या निवेदनाप्रमाणे आम्ही पोलिसांच्या गाडीने मेंढोली गावात आलो होतो. पोलिसांनी गाडी चावडीत थांबवल्यानंतर आरोपी क्र.१ त्याच्या घराच्या स्वयंपाक खोलीत आम्हाला घेऊन गेला होता. तेथून त्याने मारहाण केलेली काठी काढून दिली होती. पोलिसांनी ती जप्त करुन त्याबाबतचा आमच्या समक्ष पंचनामा केला होता. आता मला तो पंचनामा दाखवला. त्यावरती माझी अ. क्र.२ वरती स्वाक्षरी असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि. क्र. पी. ३४** देण्यात येतो. त्यावरती माझ्या सोबत असलेल्या दुस–या पंचाची देखील स्वाक्षरी आहे.

**४.** त्यानंतर पोलिसांनी त्याच दिवशी फिर्यादीने हजर केलेला राखाडी रंगाचा शर्ट व

माती रंगाची पँट जप्त करुन त्याबाबतचा पंचनामा केला होता. आता मला तो पंचनामा दाखवला. त्यावरती माझी अ.क्र.१ वरती स्वाक्षरी असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि. क्र. पी. ३५** देण्यात येतो.

५. त्यानंतर पोलिसांनी त्याच दिवशी आरोपी क्र.१ ने आणून दिलेला पांढरा शर्ट व ग्रे कलरची पँट आणि हिरव्या रंगाची साडी व निळया रंगाचा ब्लाऊज जप्त करुन त्याबाबतचा पंचनामा केला होता. आता मला तो पंचनामा दाखवला. त्यावरती माझी अ.क्र.१ वरती स्वाक्षरी असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि. क्र. पी. ३६** देण्यात येतो. त्यावरती माझ्या सोबत असलेल्या दुस–या पंचाची देखील स्वाक्षरी आहे.

६. मला पोलिसांनी आमच्या समक्ष पंचनामा करुन जप्त केलेली काठी व कपडे दाखवल्यास ओळखता येऊ शकतात. आता मला पोलिसांनी जप्त केलेली काठी दाखवली, ती तीच असून तिला वस्तू क्र. ए देण्यात आलेला आहे. आता मला पोलिसांनी जप्त केलेला फिर्यादीचा शर्ट व पँट दाखवली, ते तेच असून त्यांना वस्तू क्र. बी व सी देण्यात आलेले आहेत. आता मला आरोपी क्र.१ ने दिलेला शर्ट, पँट, साडी व ब्लाऊज दाखवले, ते तेच असून त्यांना वस्तू क्र. डी ते जी देण्यात आलेले आहेत. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपींतर्फे उलटतपास – श्री. ए. जी. पाटील वकील.**

**७.** माझे फिर्यादी व आरोपींशी चांगले संबंध आहेत. मी सदर खटल्याच्या कामानिमित्त दोन वेळा पोलिस ठाण्यात गेलो होतो. पोलिसांनी मला दि.०२.११.२०२२ रोजी सकाळी ०८.०० वाजता व त्यानंतर त्याच दिवशी पुन्हा कपडे जप्त करण्यासाठी बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी दि.२१.१०.२०२२ रोजी पंचनामा करण्यासाठी आरोपींच्या घराच्या पाठीमागील परडयात कधीही गेलो नव्हतो. मी घटनास्थळ पंचनामा झाला त्या दिवशी सकाळी ११.०० वाजता माझ्या शेताकडे चाललो होतो. मला पोलिसांनी बोलावले तेव्हा मी फिर्यादीच्या दारावरुन जात होतो.

**८.** मला कांबळे साहेबांनी पंचनाम्यासाठी बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळ पंचनाम्यावरील स्वाक्ष–या पोलिस ठाण्यात केल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही

की, पोलिसांनी मला पंचनामा वाचून दाखवला नसून मी त्यावरती स्वाक्षरी केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला पोलिसांनी बोलावलेले नसल्यामुळे पंचनाम्यातील मजकूरा बाबत माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी माझ्या सोबत दुसरा पंच प्रकाश दळवी हजर असल्याचे मी खोटे सांगत आहे. मला प्रकाश दळवी फिर्यादीच्या दुकानात कामाला असल्याची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या समक्ष पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा केल्याचे व त्यावरती स्वाक्षरी केल्याचे खोटे सांगत आहे.

९. हे म्हणणे खरे नाही की, मी दि.०२.११.२०२२ रोजी पोलिस ठाण्यात गेलो नव्हतो. कांबळे पोलिसांनी मला त्या दिवशी फोन करुन पंचनाम्यासाठी बोलावले होते. मी सकाळी ०८.०० वाजता पोलिस ठाण्यात गेलो होतो. मी ०९.३० ते १०.०० वाजेपर्यंत तेथे थांबलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिस ठाण्यात असलेल्या वेळात फिर्यादी तेथे आलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, मला त्या दिवशी फिर्यादीने पोलिस ठाण्यात आणले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी माझ्या समक्ष आरोपी क्र.१ ने पोलिसांना कोणताही निवेदन पंचनामा केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांनी तयार केलेल्या पंचनाम्यावरती स्वाक्षरी केली होती.

**१०.** हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी क्र.१ च्या सांगण्याप्रमाणे पोलिसांच्या गाडीने गावी गेल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी क्र.१ ने त्याच्या घरातून काठी काढून दिल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, जप्ती पंचनामा पोलिस ठाण्यात करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्या समक्ष फिर्यादी व आरोपी क्र.१ ने दिलेले कपडे जप्त केल्याचे खोटे सांगत आहे.

**११.** आज-यापासून मेंढोलीचे अंतर साडेतीन कि. मी. असून गाडीने जाण्यासाठी पाच ते सात मिनिटे व पायी जाण्यास अर्धा तास वेळ लागतो. मला पोलिसांसोबत गावात गेलेल्या गाडीचा क्रमांक सांगता येणार नाही. आज-यापासून आमच्या गावात मोठया गाडीने जाण्यास दहा मिनिटे लागू शकतात. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्या प्रमाणे पोलिसांनी माझ्या व दुस-या पंचासमक्ष कोणतेही पंचनामे केलेले नसून आम्ही पोलिसांच्या सांगण्यावरुन पोलिस ठाण्यात तयार केलेल्या पंचनाम्यावरती स्वाक्ष-या केल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझे व फिर्यादीचे चांगले संबंध असल्यामुळे मी त्याला

मदत करण्यासाठी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १३.१०.२०२५. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते